# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १८/२०१२-१३ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. विजय विष्णू चौगुले,<br>मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. विजय विष्णू चौगुले, मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभाग विरुध्द तक्रार दि. २०.४.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार यांनी आपली शेत जमीन गट क्र. ११६१ येथे ५ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. २७.९.२०११ रोजी चलन रु. ५०५०/- पावती क्र. ८७३३६६७ नुसार भरले व चाचणी अहवाल दि.२५.१०.२०११ रोजी दिला. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ८.२.२०१२ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने आजतागायत कुठलाही आदेश पारीत केला नाही. मंचाकडून अपेक्षित मदत - विद्युत सप्लाय कोड कलम ४.५ नुसार वीज जोडणी मिळावी व विलंबाबद्दल भरपाईची अंमलबजावणी व आदेश व्हावेत.

वि.प.ने आपल्या दि.७.५.२०१२ च्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहकाने दि. २७.९.२०११ रोजी नवीन शेतीपंप वीज जोडणीसाठी चलन भरल्याचे मान्य केले आहे. त्यांचे जेष्ठता नुसार कार्यालयीन आदेश देऊन काम करुन घेण्यात येत आहे. वितरण कंपनीकडे ज्या ग्राहकांनी दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेला आहे अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. कृती मानके विनियम २००५ कलम १२.२ नुसार कृती मानकांमधील कमतरता दूर करण्यात आली नसल्यामुळे भरपाईचा कालावधी निश्चित होत नाही. त्यामुळे नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुत तक्रारींची सुनावणी दि. ९.५.२०१२ ला मंचासमोर घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदार गैरहजर, प्रतिनिधी नेमले नाहीत. वि.प.तर्फे श्री. मैलापुरे, सहाय्यक अभियंता उपस्थित. त्यांनी मंचासमोर अर्जदार ग्राहकास दि. ३०.७.२०१२ पर्यंत वीज जोडणी देणार असे सांगितले. विलंबाबद्दल त्यांनी ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले व चाचणी अहवाल सादर केलेल्या ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे वरिष्ठ कार्यालयाचे आदेश असल्याने ग्राहकाचे काम जेष्ठतायादीनुसार करण्यात येत आहे असे सांगितले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार ग्राहकाची मागणी केल्याप्रमाणे विलंबापोटी भरपाई देण्याचे आदेश वि.प.ला देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

२) तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना वीज जोडणी देण्यासाठी वि.प.ला आदेश देणे योग्य होईल काय ?

उत्तर :होय

## कारणमिमांसा

उभयबाजूंच्या कथनानुसार ग्राहकाने दि. २७.७.२०११ रोजी चलन भरुन चाचणी अहवाल दि. २५.१०.२०११ रोजी दिला आहे. विद्युत वितरण वाहिनीचा विस्तार आहे. तक्रारदार ग्राहकास वीज जोडणी देण्यास विलंब झाला हे स्पष्ट आहे. कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात वितरण कंपनी अपयशी ठरली आहे. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी लेखी अहवालात व मंचासमोर तोंडी प्रतिपादन केले की, वितरण कंपनीकडे ज्या ग्राहकांनी दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेला आहे अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

या ग्राहकाचे जेष्ठता नुसार कार्यालयीन आदेश देऊन काम करुन घेण्यात येत आहे, भरपाई देण्यात येवू नये अशी विनंती केली. कृती मानकातील तरतुदीनुसार ३ महिन्यात वीज जोडणी देण्यात स्थानिक वि.प.चे अधिकारी अपयशी ठरले आहेत. वि.प.चे प्रशासकीय आदेश आहेत यामुळे कृती मानकाचे पालन करण्याची जबाबदारी वि.प.ला टाळता येणार नाही. श्री. मैलापुरे, सहाय्यक अभियंता यांनी तक्रारदार ग्राहकास दि. ३०.७.२०१२ पर्यंत वीज जोडणी देऊ असे मंचासमोर सांगितले. वि.प.ने विलंबाबद्दल दिलेले स्पष्टीकरण ग्राह्य धरता येणार नाही. त्यामुळे कृती मानकानुसार ग्राहकास भरपाई देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे. मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी जत उप विभाग यांनी दि. ३०.७.२०१२ पर्यंत वीज जोडणी देवून विद्युत पुरवठा करावा व त्याचा अहवाल मंचास सादर करावा.

३) वितरण कंपनी जत उप विभाग यांनी या तक्रारदार ग्राहकास प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे दि. २७.१२.२०११ ते ३०.७.२०१२ पर्यंतच्या कालावधीतील विलंबापोटी भरपाई द्यावी. सदर रकमेचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम ग्राहकाला रोखीने द्यावी. त्याचा अहवाल मंचास द्यावा.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com